3 Yrs. Sem - II
5 Yrs Sem - VI
19th Nov. 14
11-2

QP Code : **04007**

(3 Hours) [ Total Marks : 100

Constitutional Law

1. Write in two sentences :– 20
   (a) State the kinds of jurisdiction of the Federal court established by British Crown?
   (b) What is Eminent Domain?
   (c) How is the vice-president elected in India?
   (d) State the difference between prorogation and dissolution?
   (e) State the four main categories of appellate jurisdiction of the supreme court.
   (f) State any two functions of Election Commission.
   (g) When is financial emergency declared?
   (h) What is amendment by ratification of states?
   (i) State the reasonable restrictions for freedom of speech & expression.
   (j) On what grounds can a President be impeached?

2. Write short notes on (any **four**) :– 20
   (a) Directive Principles & Fundamental Rights
   (b) Judicial Activism
   (c) Right to education in India
   (d) President's Powers
   (e) Priveleges of the legislature
   (f) Administrative relations of centre and state

3. Solve (any **two**) :– 12
   (a) Shamla was denied promotion to Grade I of the Indian Foreign Service on the ground that a female employee has to obtain permission of the government in writing before her marriage is solemnised
      (i) Can Shamla challenge the denial of her promotion?
      (ii) Does such restriction violate any fundamental right of shamla?
   (b) Vivek a 22 year old man was arrested by police in connection with investigation of an offence of theft. He died in police custody the next day. The mother of the deceased alleged it as custodial death.
      (i) On what ground can the mother file a Writ petition? State the relevant article.
      (ii) Which is the landmark judgement for custodial death laid down by the supreme court?
   (c) A tribunal was appointed by the Central Government to decide the question of water of the river Cauvery which flows through two states A and B. The tribunal gave order to release water to state B. State A did not follow the said direction. State B protested against the same.

MUPD14548 The Lords Universal College of Law 11/2014 :35:37 AM MUPD14548 The Lords Universal College of Law

QP Code : 04007

(i) In the above case can the President make reference to the supreme court? Support your answer with legal provisions.

(ii) Can state A promulgate ordinance to nullify the direction of the tribunal?

4. Answer in brief (any **four**) :– 48

(a) When can National Emergency be declared? State the effects of National emergency?

(b) Explain the classification between class legislation and reasonable classification.

(c) Briefly explain the functions of the parliament?

(d) Has the Civil Rigts Protection Act achieved its object in India?

(e) What is sexual harassment of women at workplace? Explain with landmark judgements.

(f) What is religion? Explain the right to freedom of religion with reasonable restrictions.

---

(मराठी रूपांतर)

(३ तास) [ एकूण गुण : १००

१. एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा :– २०

(अ) ब्रिटीश राजवटीमध्ये स्थापना केल्या गेलेल्या फेडरल कोर्टाच्या न्यायाधिकारितेचे विविध प्रकार नमूद करा.

(ब) ''एमीनंट डोमेन''चा अर्थ स्पष्ट करा.

(क) भारताच्या उपराष्ट्रपतींची निवडणूक कशा प्रकारे केली जाते?

(ड) 'सत्रसमाप्ती' व 'सत्रविसर्जन'मधील फरक स्पष्ट करा.

(इ) भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अपिलीय अधिकारितेचे चार मुख्य प्रकार नमूद करा.

(फ) भारतीय निवडणूक आयोगाचे कोणतेही दोन कर्तव्ये (कार्ये) लिहा.

(ज) ''आर्थिक आणीबाणी'' कोणत्या परिस्थितीमध्ये उद्घोषित केली जाऊ शकते?

(ह) अर्थ स्पष्ट करा ''राज्याच्या संमतीने घटनादुरुस्ती''.

(आय) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील रास्त निर्बंध (वाजवी बंधने) कोणती आहेत?

(जे) कोणत्या कारणांवरून भारताच्या राष्ट्रपतीवर महाभियोगाची कारवाई केली जाऊ शकते?

२. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :- २०

(अ) मार्गदर्शक तत्त्वे व मूलभूत हक्क
(ब) ज्युडीशीअल अॅक्टीव्हीझम (न्यायिक सतर्कता)
(क) भारतामधील शिक्षणाचा हक्क
(ड) भारताच्या राष्ट्रपतींचे अधिकार
(इ) लोकप्रतिनिधी (खासदार-आमदार) यांचे विशेष हक्क
(फ) केंद्र व राज्यांमधील प्रशासकीय संबंध

३. सोडवा (कोणतेही **दोन**) :- १२

(अ) भारतीय परराष्ट्र सेवेत द्वितीय श्रेणीमध्ये काम करीत असलेल्या शामला यांस प्रथम श्रेणीच्या पदावरील बढती (पदोन्नती)पासून वंचित ठेवण्यात आले. सदर पदोन्नती नाकारण्याकरिता असे कारण दिले गेले की कोणत्याही स्त्री कर्मचाऱ्यास तिने विवाहबद्ध होण्यापूर्वी सरकारकडून लेखी परवानगी प्राप्त करणे हे बंधनकारक आहे.

(१) बढती नाकारण्याच्या निर्णयाला शामला आव्हान देऊ शकते का?
(२) अशा प्रकारच्या निर्बंधामुळे शामलाच्या कोणत्या मूलभूत हक्काचे हनन (उल्लंघन) झाले आहे?

(ब) एका चोरीच्या प्रकरणातील तपासाच्या संदर्भात पोलिसांनी विवेक ह्या २२ वर्षीय तरुणास अटक केली. अटकेच्या दुसऱ्याच दिवशी सदर तरुण पोलीस कोठडीत मरण पावला. मयत विवेकच्या आईने पोलिसांवर 'कोठडीतील मृत्यू' हा आरोप ठेवला.

(१) मयत विवेकची आई ही कोणत्या मुद्यांच्या आधारावर कोर्टामध्ये प्राधिलेख अर्ज दाखल करू शकते? राज्यघटनेतील संबंधीत अनुच्छेद लिहा.
(२) सर्वोच्च न्यायालयातर्फे कोणत्या खटल्यामध्ये "कोठडीतील मृत्यू" ह्या संदर्भात ऐतिहासिक निर्णय देण्यात आला?

(क) 'अ' आणि 'ब' अशा दोन राज्यांमधून वाहणाऱ्या कावेरी नदीच्या पाणीवाटपाच्या वादावर तोडगा काढण्याकरिता केंद्रशासनाने एका लवादाची नेमणूक केली 'अ' राज्याकडून 'ब' राज्यासाठी पाणी सोडण्यात यावे असा निर्णय पाणी लवादाने दिला. मात्र 'अ' राज्याने हा निर्णय पाळला नाही व 'ब' राज्याने ह्याबद्दल विरोध केला.

(१) अशा प्रकरणामध्ये राष्ट्रपती हे सर्वोच्च न्यायालयाकडे हा प्रश्न निर्देशित करू शकतात का? सांविधानिक तरतुदीच्या आधारे आपले उत्तर स्पष्ट करा.
(२) लवादाच्या निर्णयाला रद्दबदल करण्याच्या हेतूने 'अ' राज्य हे अध्यादेश प्रस्थापित करू शकते का?

JPDI4548 The Lords Universal College of Law

४. सविस्तर उत्तरे लिहा :-

(अ) कोणत्या परिस्थितीमध्ये 'राष्ट्रीय आणीबाणीची उद्घोषणा केली जाऊ शकते? राष्ट्रीय आणीबाणीच्या उद्घोषणेचे परिणाम स्पष्ट करा.

(ब) विशिष्ट वर्गीकरण (क्लास लेजीसलेशन) व रास्त वर्गीकरण (रीझनेबल क्लासीफिकेशन) यामधील वर्गीकरणाचा फरक सविस्तर स्पष्ट करा.

(क) भारतीय संसदेचे विविध कार्ये (कर्तव्ये) सविस्तर स्पष्ट करा.

(ड) ज्या उद्देशाने 'नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५' हा कायदा लागू करण्यात आला ते भारतामध्ये गाठले जाऊ शकले आहे की नाही ह्याबद्दल सविस्तर मजकूर लिहा.

(इ) ''कामाच्या ठिकाणी स्त्रियांवरील लैंगिक छळवणूक'' (सेक्शुअल हॅरॅसमेंट ऑफ विमेन ॲक्ट वर्कप्लेस) ह्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाद्वारे दिल्या गेलेल्या ऐतिहासिक निकालाच्या आधाराने सविस्तर मजकूर लिहा.

(फ) ''धर्म'' म्हणजे काय? धर्मस्वातंत्र्यावरील हक्क व त्यावरील रास्त निर्बंध ह्याविषयी सविस्तर लिहा.

---



MUPD14548 The Lords Universal College of Law 11/19/2014 9:35:38 AM MUPD14548 The Lords Universal College of Law